# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्र.२९०/२०२५**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानवशास्त्र विभागातील, माजी म्युझियम क्युरेटर, डॉ. नरेंद्र बोखारे यांनी विद्यापीठास दिलेल्या देणगीतून म्हणजेच ''इरावती नरेंद्र स्थायी निधीमधून वर्ग-३ व वर्ग-४ मधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उच्च शिक्षण व प्रोत्साहनपर निधीमधून'' चक्रक्रमाने प्रथम वर्ग-३ व त्यानंतर वर्ग-४ मधील इच्छुक शिक्षकेतर सेवकांना उच्च शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता रु.५,५६१/- आर्थिक सहाय्य द्यावयाचे आहे.

सदर निधी देण्यासंबंधी नियम, अटी व कार्यपध्दती लागू करण्यात आलेली असून सोबत नियम, अटी व कार्यपध्दतीची प्रत जोडली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता वर्ग ४ मधील जे सेवक उच्च शिक्षण व संशोधन करु इच्छितात त्यांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज भरुन **दिनांक २० नोव्हेंबर, २०२५** पर्यत प्रशासन शिक्षकेतर विभागाकडे सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(प्रा.(डॉ) ज्योती भाकरे)**
प्रभारी कुलसचिव

**सोबत :-** नियम, अटी व कार्यपध्दतीची प्रत

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र.एएन/3902
दिनांक : 07 NOV 2025

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग ) आपणास विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील
२. मा.विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग ) सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणावे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**“इरावती नरेंद्र स्थायी निधीमधून वर्ग-३ व वर्ग-४ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उच्च शिक्षण व प्रोत्साहनपर निधी” मधून आर्थिक मदतीसाठी नियम व अटी**

१) सदर निधी अंतर्गत आर्थिक मदत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यात आली आहे.

२) या निधीचे नाव “इरावती नरेंद्र स्थायी निधिमधून वर्ग ३ व वर्ग ४ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उच्च शिक्षण व प्रोत्साहनपर निधी” असे असून सदर निधी चक्रक्रमाने प्रथम वर्ग ३ व त्यानंतर वर्ग ४ मधील सेवकांसाठी देण्यात येईल.

३) संबंधित कर्मचाऱ्याची किमान ५ वर्षे विनाखंड नियमित सेवा झालेली असावी.

४) संबंधित कर्मचाऱ्याच्या यापूर्वीच्या पाच वर्षांच्या गोपनीय अहवालापैकी किमान तीन वर्षाचे गोपनीय अहवाल “अ” दर्जाचे असावेत. (गोपनीय अहवालाची प्रतवारी विचारात घेण्यात येईल.) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्याबाबत संबंधित विभागप्रमुखांकडून सविस्तर अहवाल घेण्यात येईल.

५) एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करुन क्रमवारी ठरविण्यात येईल.

६) प्रतिवर्षी एकाच शिक्षकेतर कर्मचाऱ्यास सदर निधीअंतर्गत आर्थिक मदत देण्यात येईल.

७) संबंधित कर्मचाऱ्यावर कोणतीही गंभीर कारवाई झालेली नसावी किंवा गंभीर स्वरुपाची चौकशी सुरु नसावी.

८) सदर निधीसाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीच्या दिवशी संबंधित व्यक्ती पदावर कार्यरत असावी.

९) संबंधित शिक्षकेतर सेवक सेवेत असताना एकदाच सदर निधीस पात्र राहील.

१०) दरवर्षी सदर निधी देण्यासाठी खालीलप्रमाणे छाननी समिती राहील.

   १. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले उपकुलसचिव (अध्यक्ष)

   २. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले सहायक कुलसचिव (सदस्य)

   ३. उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष (सदस्य सचिव)

११) संबंधित शिक्षकेतर सेवकांनी सदर निधीसाठी आपल्या विभागप्रमुखांमार्फत अर्ज सादर करावा.

१२) योग्य उमेदवार (suitable) उपलब्ध न झाल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव परिस्थितीनुरुप, सदर निधी राखून ठेवण्याचे तसेच देण्याचे अधिकार छाननी समितीस राहतील.

१३) छाननी समितीमध्ये असलेल्या सदस्यांबाबत आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

१४) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सदर निधी खालीलप्रमाणे वापरण्यात येईल.

   अ) वर्ग-४ करिता किमान पदवीस्तरावरील शिक्षणासाठी

   ब) वर्ग-३ करिता पदव्युत्तरस्तरावरील शिक्षणासाठी

१५) सदर निधी हा वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकेतर सेवकांकरिताच राहील.

E:\my document\2017\Iravati Narendra Corporus Fund\Circular and Form  Iravati Narendra Bokhare.docx

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

"इरावती नरेंद्र स्थायी निधीमधून वर्ग-३ व वर्ग-४ मधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उच्च शिक्षण व प्रोत्साहनपर निधी" सन २०२५-२०२६ करिता मूल्यांकन प्रतिवेदन

**स्वयंमूल्यांकन अहवाल (संबंधित सेवकाने भरावयाची माहिती)**

**भाग-अ : सेवकाची वैयक्तिक माहिती**

**फोटो**

१) सेवकाचे संपूर्ण नाव :

२) सध्याचे पदनाम आणि वर्ग पदनाम :

वर्ग : क / ड

३) सध्याचा विभाग :

४) प्रथम नियुक्तीचे पद व दिनांक पदनाम :

रुजू दिनांक :

५) सध्या धारण करीत असलेली शैक्षणिक अर्हता :

६) संगणकाचे ज्ञान :

७) एकूण सेवा कालावधी : ....... वर्ष, ....... दिवस

८) जन्म दिनांक :

९) सेवानिवृत्ती दिनांक :

१०) सदर निधी अंतर्गत यापूर्वी आर्थिक मदत मिळाली आहे का ? : आहे / नाही

## भाग-ब : सेवकाची इतर माहिती

११) धारण केलेली पदे, विभाग, वर्ग व कालावधी :

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | विभाग | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२) सेवांतर्गत प्रशिक्षणाचा तपशील :

१३) सेवा कालावधीत शिक्षा झालेली आहे का? असल्यास शिक्षेचे स्वरुप व शिक्षेचे वर्ष : आहे / नाही

१४) क्राईम - ऑफेन्स / नैतिक अध:पतन विषयक काही गुन्हयांची नोंद आहे काय? आणि तो सिध्द झाला आहे काय?

१५) यापूर्वी उच्च शिक्षणाकरिता निधी मिळालेला आहे काय ? :

१६) सदर निधीअंतर्गत आर्थिक मदत आपल्याला का मिळावी याबाबतचे आपले स्पष्टीकरण :

वर मी दिलेली सर्व माहिती खरी असून कोणताही तपशील खोटा वा दिशाभूल करणारा आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी असेल.

दिनांक : सही :-

ठिकाण : नाव :-

"इरावती नरेंद्र स्थायी निधीमधून वर्ग-३ व वर्ग-४ मधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उच्च शिक्षण व प्रोत्साहनपर निधी" सन २०२५-२०२६ करिता मूल्यांकन प्रतिवेदन

**मा.विभागप्रमुख यांनी सादर करावयाचा अहवाल**

१) सेवकाचे नाव :

२) पदनाम :

३) सेवकाची विश्वासार्हता :

४) सर्वसाधारण वर्तणूक :

५) कामाची कार्यतत्परता :

६) कामातील अचूकता :

७) कामातील व्यवस्थितपणा :

८) कामातील नियमितपणा :

९) कामाची विश्वासार्हता :

१०) कामाची सखोल माहिती :

११) कार्यालयीन कामाची आत्मियता :

१२) सहकार्याची भावना :

१३) उपस्थितीमधील वक्तशिरपणा :

१४) वरिष्ठांशी वर्तणूक :

१५) सहकाऱ्यांशी वर्तणूक :

१६) विद्यापीठाविषयी निष्ठा :

१७) कामाव्यतिरिक्त इतर विशेष कला,गुण,नैपुण्य :

१८) गणवेश नियमित वापरतात का ? (वर्ग ४ साठी) :

१९) आपल्याला या सेवकाची निवड का करावीशी वाटते याबाबतचे अभिप्राय :

२०) इतर पूरक माहिती :

वरील माहिती उपलब्ध कागदपत्रे, प्रत्यक्ष पाहून व अन्य माध्यमातून ज्ञात आहेत. ती सत्य असून सदर आर्थिक मदतीकरिता मी त्यांची शिफारस करीत आहे.

दिनांक :

विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का